# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
# पोस्ट- कृषि नगर, अकोला ४४४१०४ (महाराष्ट्र)

वाचा : १. जाहिरात क्र. बीईए/प्रकल्पग्रस्त/गट-क/जाहिरात/३८३४/२०२५, दिनांक २७.०२.२०२५

## कागदपत्रे पडताळणी बाबत सुचना

जा.क्र. क्र. बीईए/प्रकल्पग्रस्त/गट-क/जाहिरात/२०२५/ दिनांक २७.०३.२०२६

उपरोक्त संदर्भांकित नमुद विद्यापीठ जाहिरातींच्या अनुषंगाने, वाहन चालक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेमध्ये व व्यावसायीक/प्रात्यक्षित परिक्षेमध्ये प्राप्त गुणांची यादी विद्यापीठाचे संकेतस्थळावर यासह प्रसिध्द करण्यात येत आहे.

त्यानुसार यादीमध्ये नमुद प्राप्त गुणांच्या आधारे, जाहिरातींमध्ये नमुद रिक्त पदसंख्या लक्षात घेवुन उमेदवारांना कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी गुणानुक्रमे पर्याप्त संख्येत बोलाविण्यात येत आहे.

उपरोक्तनुसार वाहन चालक या पदाकरीता अर्ज सादर केलेल्या उमेदवारांची कागदपत्रे पडताळणीकरीता उमेदवारांची यादी यासह विद्यापीठाचे संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर प्रसिध्द करण्यात येत असुन यादीमध्ये नमुद उमेदवारांनी खालीलप्रमाणे विहित दिनांकास कागदपत्रे पडताळणी करीता उपस्थित राहण्याचे सुचित करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १ | वाहन चालक | शुक्रवार, दि. ०३.०४.२०२६ | सकाळी १०.३० ते ५.०० वाजेपर्यंत (हजेरी वेळ सकाळी १०.०० वाजता) | विद्यापीठ मुद्रणालय सभागृह, विस्तार शिक्षण संचालनालय, कृषि महाविद्यालयाचे मागे, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला. |

संबधीत उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेचे प्रवेशपत्र व फोटो ओळखपत्र तसेच अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती व छायांकीत प्रतींची स्वसाक्षांकीत एक संच सोबतच्या तक्त्यामध्ये नमुद अनुक्रमानुसार सोबत आणावा. (नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र आवश्यक असणाऱ्या उमेदवारांबाबत दि. २१.०७.२०२५ रोजी वैध असलेली प्रमाणपत्रे व त्यापुर्वी निर्गमीत झालेले प्रमाणपत्र आवश्यक) कागदपत्रांच्या पडताळणीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी नियोजीत दिवशी उपस्थित राहावे. जे उमेदवार नियोजीत वेळ व दिनांकास उपस्थित राहणार नाही अथवा जे उमेदवार नमुद केलेली कागदपत्रे पुरविण्यास असमर्थ ठरतील असे उमेदवार गुणवत्ता यादीत जरी अग्रस्थानी असले तरी त्यांची उमेदवारी ग्राहय धरण्यात येणार नाही तसेच नंतर त्याविषयी कुठल्याही प्रकारची तक्रार/विनंती मान्य करण्यात येणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

उमेदवारांना केवळ कागदपत्रे पडताळणीसाठी बोलाविण्यात आले म्हणुन त्यांची निवड झाली असे समजण्यात येवु नये.

**स्वाक्षरीत/-**
उपकुलसचिव (आस्था.) तथा
पदसिध्द सचिव,
क व ड वर्ग कर्मचारी निवड समिती
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला.